# कार्यकारी सारांश

## २०१७चे केस क्र. ५

## आरइन्फ्रा–डी आणि आरइन्फ्रा–जी यांच्यामार्फत ऊर्जा प्राप्ती नियोजन आणि ऊर्जा खरेदी करारनाम्यासाठी दाखल केली गेलेली याचिका

## कार्यकारी सारांश : २०१७चे केस क्र. ५

१. रिलायन्स इन्फ्रास्टक्चर लि.–डिस्ट्रिब्युशन (आरइन्फ्रा–डी) आणि रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि–जनरेशन (आरइन्फ्रा–जी) यांनी आरइन्फ्रा–डीच्या ऊर्जा प्राप्ति नियोजनाच्या आणि आर इन्फ्रा–डी आणि आरइन्फ्रा–जीमधल्या ऊर्जा खरेदी व्यवस्थेसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (म.वि.नि.आ) विनियम २००३ (विनियम) च्या कलम ८६(१)ए, ८६ (१)बी अन्वये आणि म.वि.नि.आ (बहुवार्षिक वीजदर) विनियम २०१५च्या विनियम २०.१ अन्वये २०१७ची केस क्र.५ फाइल केली आहे.

२. आरइन्फ्रा–जीने डहाणू औष्णिक वीज केंद्रामधून (डीटीपीएस) मधून ५०० मेगा वॅट विक्रीसाठी ऊर्जा खरेदी व्यवस्थेत (पीपीए) करार केला होता, हा करार म.वि.नि.आ ने मंजूर केलेल्या टॅरीफवर आरइन्फ्रा–डीसोबत २३–०२–२००८ ते २२–०२–२०१८ अशा १० वर्षांसाठी करण्यात आला होता. सदर व्यवस्थेला म.वि.नि.आ मार्फत तिच्या आदेश क्र. ८/२००८ दिनांक १२–०२–२००९ अन्वये मंजूरी देण्यात आली होती.

३. आरइन्फ्रा (डी)चा मूलभूत भार १००० मेगावॅटपेक्षा जास्त असून, त्याची पूर्तता आरइन्फ्रा (जी) सोबत आधीपासून अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेमार्फत आणि व्हीआयपीएलसोबत असलेल्या पीपीए मार्फत केली जाते ज्यामध्ये हे स्पष्ट केले गेले आहे की मूलभूत भार आवश्यकता आणि परिणामतः ऊर्जा प्राप्ती व्यवस्था (पीपीए) जी आरइन्फ्रा–जी सोबत फेब्रुवारी २०१८ पासून पुढच्या १८ वर्षांसाठी प्रस्तावित करण्यात आली आहे, ती सदर मूलभूत भाराच्या आवश्यकतेला पूर्ण करण्यासाठी न्यायसंगत आहे. यामुळे स्पष्टपणे हे दर्शवले जाते की ऊर्जा प्राप्ति नियोजनानुसार आरइन्फ्रा–डी मार्फत प्रस्तुत केल्यानुसार ५०० मेगा वॅटपर्यंतच्या ऊर्जा प्राप्तिची आवश्यकता आहे.

४. आरइन्फ्रा–डी आणि आरइन्फ्रा–जी यांनी वर्तमान याचिकेत खालील प्रस्तुती केल्या आहेत:

- डीटीपीएस टॅरिफ (वजा सक्षम प्राप्तिची रक्कम) आर्थिक वर्ष २०१७–१८ साठी म.वि.नि.आ द्वारे २०१६च्या केस नं १४ दिनांक १८–०८–२०१६ रोजी मंजूर केलेल्या एमवायटी ऑर्डरमध्ये दिल्यानुसार स्पर्धात्मक बोलीमध्ये सापडलेल्या किमतींच्या तुलनेत स्पर्धात्मक आहे.
- आरइन्फ्रा–डी ने डीटीपीएससोबत पीपीएचे लाभ आपल्या स्वस्त निश्चित किमतीच्या दृष्टीकोनातून अधोरेखीत केले आहेत कारण प्रकल्प २२ वर्षांपासून कार्यरत आहे आणि तिच्या बहुतांश मालमत्तांचा घसारा झाला आहे.
- आरइन्फ्रा–डी च्या ग्राहकांनी गेल्या २२ वर्षांपासून वीज प्रकल्पाची निश्चित किंमत दिली आहे आणि अशा ग्राहकांना अवनत मालमत्तेच्या लाभापासून वंचित ठेवले जाऊ नये. दर पत्रक धोरणामध्ये असे नमूद केले आहे की पूर्ण घसारीत मालमत्तेमुळे कमी झालेल्या दराचा लाभ ग्राहकांना उपलब्ध असावा.
- डीटीपीएसची स्थापना पूर्वीच्या परवान्यामध्ये असलेल्या अटीनुसार परवाना क्षेत्रात वीज पुरवठा करण्यासाठी झाली होती.
- डीटीपीएसमध्ये गुंतवलेले भांडवल प्रकल्पाच्या उपयोगी आयुष्यमानाच्या कालावधीत लाभार्थींकडून वसूल करण्याची तरतुद आहे. आज मितीला सम्मेलित घट जीएफएच्या ७०% आहे. आरइन्फ्रा–डी ने त्यानुसार डीटीपीएस ऊर्जेचा उपयोग आपल्या मुंबईच्या परवानाप्राप्त क्षेत्रासाठी, आपल्या परवान्याच्या समाप्ती दिनांकापर्यंत वापरण्याचा निर्णय घेतला आहे, नाहीतर डीटीपीएसच्या गुंतवणूक केलेल्या उर्वरीत भांडवलाला आपल्या लाभार्थींकडून वसूल करण्याचा संस्थेकडे विकल्प आहे.
- डीटीपीएसच (एंबेडेड निर्माणाचे) इतर लाभ अशा प्रकारे आहेत:
  - डीटीपीएस लोड सेंटर जवळ स्थित असल्याने आंतरराज्य ट्रान्समिशन प्रणालीचा तोटा कमी करण्यास मदत होते, स्टेट ट्रान्समिशन तोट्याच्या ३.९२%च्या तुलनेत डीटीपीएस ते मुंबईच्या प्रणालीतून वीज आणत वास्तविक तार्कीक नुकसान २% पेक्षा कमी आहे. त्यामुळे राज्य पातळीवर पारेषण नुकसान कमी होते.
  - डीटीपीएस प्रतिक्रियात्मक ऊर्जा भरपाई १४० एमव्हीएआर पर्यंत ग्रिडमध्ये वोल्टेज स्थिरता राखण्यासाठी उपलब्ध करुन देते. याच्या अनुपस्थितीत, अतिरिक्त गुंतवणूक करायला लागली असती, ज्यामुळे महाराष्ट्रातील ग्राहकांवर अतिरिक्त बोजा पडला असता.

- डीटीपीएस पॉवर प्लँट मुंबईच्या आयलँडिंग योजनेत महत्वाची भूमिका निभावतो. समर्पित ट्रान्समिशन लाइनद्वारे मुंबईला वीज पुरवणाऱ्या ट्रान्समिशन सब स्टेशनशी डीटीपीएस जोडलेले आहे आणि डीटीपीएसपासून मुंबईला वीज पुरवठा करण्यास कोणतीही अडचण नाही. त्यामुळे विश्वासार्ह मुंबई ऊर्जा यंत्रणा राखण्यासाठी आणि बाह्य घटकांना स्थिरता देण्यासाठी पुरेश्या भार केंद्रा जवळ वीज निर्माणाची आवश्यकता आहे.
- अंगभूत वीज निर्मिती केंद्र भार केंद्राच्या जवळ असल्यामुळे अडथळ्याच्या काळात ऑसीलेशन शोषणाची आणि निष्क्रीय करण्याची आंतनिहित क्षमता अंगभूत असते त्यामुळे अंगभूत वीज काढल्याने ग्रिड अस्थिरता निर्माण होऊ शकते.

- अंगभूत वीज निर्मिती केंद्र काढून टाकल्यामुळे येणाऱ्या परिणामाला वैकल्पिक स्त्रोतासोबत तुलना करताना नवीन ट्रान्समिशन लाईन निर्माणाचा, एमवीएआर समर्थन उपलब्ध करुन देण्याचा अतिरिक्त खर्च आणि वाढता ट्रान्समिशन लॉसेसचा अतिरिक्त खर्च तसेच डीटीपीएसची भांडवली गुंतवणूक (वजा घसारा) लाभार्थीकडून वसूली इत्यादी विचारात घेण्याची आवश्यकता आहे.
- हा देशातील सर्वात कार्यक्षम प्रकल्पांपैकी एक प्रकल्प आहे आणि सतत आरइन्फ्रा-डी ला वीज पुरवठा करत असल्यामुळे वीज खरेदी किंमत कमी करण्यात मदत करीत आहे.
- डीटीपीएसला साऊथ,इंडियन कोलफिल्ड्स लिमिटेड (एसइसीएल) कडून दीर्घकालीन इंधन पुरवठा व्यवस्था (एफएसए) आहे, जी २०२९ पर्यंत वैध आहे आणि अशा सवलतीच्या दरातील कोळश्याचा (लिंकेज कोल) लाभ आरइन्फ्रा-डी च्या ग्राहकांना उपलब्ध होणार आहे.
- जानेवारी २०१६मध्ये घेण्यात आलेल्या युनिट १च्या आरएलए अभ्यासानुसार, सरासरी उपयुक्त जीवनाच्या केवळ ३०% उपयोग झालेला आहे. युनिट २चा आरएलए अभ्यास जानेवारी २०१८ मध्ये आखण्यात आला आहे. समान विंटेज, कार्य व देखभाली मुळे युनिट २ आरएलए अभ्यासाचे परिणाम देखील एकसमान येण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.
- महाराष्ट्रामध्ये प्रमुख निर्मितीचे महत्वपूर्ण स्त्रोत महाराष्ट्राच्या पूर्व भागात आढळतात, तर भार केंद्रे पश्चिम महाराष्ट्रात आढळतात. त्यामुळे महाराष्ट्राच्या पश्चिम भागात असलेले वीज निर्मिती केंद्र सुरक्षा आणि ग्रिडच्या सुरक्षिततेच्या संदर्भात महत्वाची भूमिका पार पाडतात.
- अपुऱ्या पारेषण व्यवस्थेमुळे मुंबई ग्राहकांना अखंडीत वीज पुरवठा करण्यासाठी मुंबई बाहेरील वीज आणण्यास आणि एन-१-१ निकष पूर्ण करण्यासाठी अडथळे आहेत. परिणामी डीटीपीएससोबत पीपीएच्या अनुपस्थितीत मुंबईच्या ग्राहकांना ग्रिडच्या संबंधातील समस्यांमुळे लोड शेडिंगला सामोरे जावे लागू शकते.

५. वास्तविकता आणि वर दिलेल्या परिस्थितींमध्ये, म.वि.नि.आ. कडे आदराने खालील नमुद बाबीसाठी प्रार्थना समर्पित करत आहे:

र. आर्थिक वर्ष २०१७-१८ ते आर्थिक वर्ष २०३५-३६ या कालावधीसाठी ऊर्जा प्राप्ति नियोजनाला मंजूर करण्यात यावे.

ल. ऊर्जा खरेदी व्यवस्थेला आरइनफ्रा-जी कडून आरइन्फ्रा-डी ला २३-०२-२०१८ ते १५-०८-२०३६ या कालावधीसाठी ५०० मेगावॅट पुरवठ्याची मान्यता देण्यात यावी.